MHNS180020022021

<u>**नि.दि.दावा क्र. १००/२०२१ मधील निशाणी क्र.०५ वरील आदेश**</u>
**(मिलींद व इतर -वि- नारायण व इत)**

०१. वादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ सह कलम १५१ नुसार तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादींचे असे कथन आहे की, त्याची मौजे साकोरेपाडा, ता.कळवण जि.नाशिक येथे जमीन गट क्र. ११९ (पुर्वीचा सर्वे क्र. ११०/१ व ११०/२ आणि पुर्वीचा गट क्र. १५९), क्षेत्रफळ ०२.८८ आर अधिक पोटखराबा ००हे-२३आर असे एकुण ०३हे-११आर ही शेत जमीन आहे (या पुढे सदर जमीनीस वाद मिळकत असे संबोधण्यात येते).

०२. वादींनी प्रस्तुत दावा हा वादमिळकत संबंधाने मालकी हक्काने कब्जासाठी व निरंतर ताकीदीचे हुकूमासाठी सदरचा दावा दाखल केला आहे. परंतु सदर दाव्याचा अंतीम निकाल लागण्यास बराच कालावधी लागु शकतो. त्यादरम्यान प्र.वादींनी वादमिळकतीचा कब्जा हा त्रयस्थ इसमांना हस्तांतरीत करु नये अथवा वादीमिळकतीवर कोणताही बोजा निर्माण करु नये अशा स्वरुपाचा तुर्तातुर्त मनाईहुकूम मिळणेसाठी वादींनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादींचे सकृतदर्शनी केस असुन न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे. वादींचा अर्ज मंजूर झाला नाही तर त्यांचे अपरिमित नुकसान होईल. याउलट प्र.वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वादींनी प्रस्तुत अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

०३. प्रतिवादींना संधी देउनही त्यांनी सदर दाव्यात त्याचे म्हणणे/कैफियत दाखल केली नाही. सबब, दिनांक ०७/०६/२०२२ रोजीच्या निशाणी क्र. ०१ वरील आदेशानुसार प्रस्तुत दावा प्र.वादीं विरुध्द विनाकैफियत चालविण्यात येत आहे.

०४. वादीचा अर्ज व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे विधीज्ञ श्री.

ए.व्ही.जुन्नरे यांचा युक्तीवाद ऐकला.

०५. माझ्यासमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यावर मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादींनी सकृत दर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे काय ? | होय. |
| ०२. | वादींनी न्यायाचा/सोयीचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय ? | होय. |
| ०३. | मनाई हुकूम नाकारल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल असे वादींनी सिध्द केले आहे काय ? | होय. |
| ०४. | आदेश काय ? | वादींचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## : कारणमिंमासा :

### मुद्दा क्र.०१ ते ०३ करीता -

०६. वादींनी प्रस्तुत अर्जासोबत वादमिळकतीच्या सातबारा उता-याच्या प्रती, तहसिलदार कळवण यांच्याकडील कु.का.के.नं. ०६/२०१२ च्या निकालाची साक्षांकीत प्रत, सहा. जिल्हाधिकारी कळवण यांच्याकडील आर.टी.एस.अपील क्र. ११/२०१६, महाराष्ट्र रेव्हेन्यु ट्रायब्युनल यांच्याकडील रिव्हीजन क्र. १७१/२०१६ च्या निकालाची साक्षांकीत प्रत, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिटपिटीशन क्र. ७८२७/२०१८ च्या निकालाची प्रत, प्र.वादींनी रे.मु.क. ४४/२०१८ स्वतःहुन काढुन घेतला त्या ॲवार्डची साक्षांकीत प्रत, तहसिलदार कळवण यांच्याकडील कु.का.के.नं. १२/२०१८ च्या निकालाची प्रत, प्रांत कळवण यांच्याकडील कु.का.रि.नं. १६/२०१९ च्या निकालाची साक्षांकीत प्रत असे कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच अर्जाच्या पुष्टयर्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

०७. वादींतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की वादमिळकतीचे मुळ मालक हे रामकृष्ण तानाजी महाजन होते. त्यांना सदर मिळकत वाटपाने मिळाली होती.

वादमिळकतीच्या सातबारा उता-यावर काळु सयाजी बागुल यांचे कुळ म्हणुन नांव होते. सदर काळु बागुल यांना कोणतेही अपत्य नव्हते. त्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर त्यांचा कुळहक्क संपुष्टात आला आहे. असे असतांना त्यांनी वादमिळकतीचे कुळहक्क मृत्युपत्राआधारे सोनिबाई मोतीराम राउत यांना दिले आहेत. सोनिबाई मयत झाल्यानंतर प्र.वादींची नांवे इतर अधिकारात लागली आहेत. प्र.वादी यांनी तहसिलदार कळवण यांच्यासमोर टेनन्सी केस क्र. ०६/२०१२ दाखल केली होती. त्यामध्ये निकाल होउन वादमिळकतीवरील कुळधारक काळु सयाजी बागुल यांना अपत्य नसल्यामुळे त्यांची कुळ वहिवाट संपुष्टात आली असे घोषित करण्यात आले. त्यावर प्र.वादींनी सहा. जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात अपील क्र. ११/२०१६ दाखल केले. त्यामध्ये निकाल होउन अपील फेटाळण्यात आले व तहसिलदार यांचा आदेश कायम करण्यात आला. त्यानंतर प्र.वादींनी महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे रिव्हीजन अर्ज क्र. ०६/२०१६ दाखल केला. सदर रिव्हीजन फेटाळण्यात आले व सहा. जिल्हाधिकारी व तहसिलदार कळवण यांचा आदेश कायम करण्यात आला. त्यानंतर प्र.वादींनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. १८२७/२०१८ दाखल केले. सदरचे रिट पिटीशन फेटाळण्यात आले व त्यामध्ये महसुल न्यायाधिकरण, सहा. जिल्हाधिकारी व तहसिलदार कळवण यांचे आदेश कायम ठेवले. अशाप्रकारे प्र.वादी हे वादीमिळकतीचे कुळ नाहीत हे निकालाद्वारे ठरविण्यात आले आहे.

०८. वादींचे असे कथन आहे की वादमिळकतीवरील मुळ कुळधारक नामे काळु सयाजी बागुल हा मयत झाला आहे. त्यास कोणतही अपत्य नव्हते. त्यामुळे त्याचा वादमिळकतीवरील कुळहक्क हा संपुष्टात आला आहे. प्र.वादींकडुन कोणतीही लेखी कैफियत दाखल करण्यात आली नाही. त्यामुळे वादींचे कथन हे आव्हानीत झालेले नाही. अभिलेखावरील दाखल केलेल्या वादमिळकत गट क्र. ११९ च्या सातबारा उता-याचे अवलोकन केले असता प्र.वादी यांचे भोगवटदार म्हणुन नाव नमुद आहे. तसेच प्र.वादींचे कुळ या नात्याने नांवे नमुद आहेत. परंतु तहसिलदार, कळवण, उपविभागीय अधिकारी कळवण, महसुल न्यायाधिकरण मुंबई, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांच्या

निकालाद्वारे मयत काळु सयाजी बागुल हा मयत झाल्यामुळे त्याचे वादमिळकतीवरील कुळहक्क संपुष्टात आल्याचा आदेश पारीत केला. ही बाब निर्विवाद आहे की वादमिळकत ही प्र.वादींच्या ताब्यात आहे. यापुर्वी नमुद केल्याप्रमाणे विविध न्यायालयांच्या निकालांनुसार मयत काळु सयाजी बागुल यांचे वादमिळकतीवरील कुळहक्क संपुष्टात आल्यामुळे प्र.वादी यांना मृत्युपत्राआधारे कोणतेही कुळ अधिकार प्राप्त होत नाहीत. परंतु, वादमिळकत ही प्र.वादींच्या ताब्यात असल्यामुळे त्यांच्याकडुन वादमिळकतीचा ताबा त्रयस्थ व्यक्तिस हस्तांतरीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादी यांची नांवे महसुल अभिलेखात भोगवटदार म्हणुन आहेत. अशाप्रकारे वादींची प्रथमदर्शनी केस दिसुन येते. वादींनी प्रथमदर्शनी दर्शनी केस सिध्द केल्यामुळे न्यायाचा समतोल हा त्यांच्या बाजुने आहे. त्यामुळे निश्चीतच वादींच्या हक्कात मनाई हुकूम दिला नाही तर त्यांचे अपरीमीत असे नुकसान होईल. याउलट प्र.वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मी, मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्रमांक ०४ च्या अनुशंगाने खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

०१. वादींचा तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज निशाणी क्र.०५ मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादींनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत वादमिळकतीचा ताबा कोणत्याही त्रयस्थ इसमांस हस्तांतर करु नये अथवा त्यावर बोजा निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्यात येतो.

०३. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

**सही /-**

दिनांक - १६.०९.२०२२

**( पी. के. मुटकुळे )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळवण.

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईलमधील न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव - श्री. एन.एस.धर्माधिकारी.
न्यायालयाचे नांव - दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कळवण.

दिनांक- १६.०९.२०२२
कळवण.